# जिल्हा परिषद रत्नागिरी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन
माळनाका, रत्नागिरी - ४१५६१२
सामान्य प्रशासन विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दुरध्वनी क्र. ०२३५२ - २२२४२८ ई-मेल :- dyccogad08@gmail.com

जा.क्र. रजिप/साप्रवि/आस्था-९/ ३१४९ /२०२२ दिनांक - ०१.०८.२०२२

**वाचा :-** १) महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७.
२) महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा सुधारीत (सेवा प्रवेश) दि.०१.०८.१९८१.
३) महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा सुधारीत (सेवा प्रवेश) दि.०१.१२.१९८८
४) या कार्यालयाकडील जा.क्र.रजिप/साप्रवि/आस्था-९/६०८३/२०२१ दिनांक ०९.१२.२०२१ चे आदेश.
५) ग्राम विकास विभागाकडील पत्र क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.६०६/अस्था-७ दि.२५ फेब्रुवारी २०२२ अन्वये जिल्हा परिषद सातारा यांना दिलेले मार्गदर्शन.
६) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.रत्नागिरी यांचकडील मंजूर टिप्पणी दिनांक ०१.०८.२०२२.

**आदेश :-**

श्री.विजय पांडुरंग खेडस्कर, वरिष्ठ सहाय्यक(लिपिक) ,ग्रा.पा.पु. विभाग जि.प.रत्नागिरी, यांची प्रथम नियुक्ती कनिष्ठ सहाय्यक या मूळ पदावर झाली आहे. सरळसेवा नियुक्ती करिता महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा(सेवा प्रवेश) नियम १९६७ परिशिष्ट ९ मधील अ.क्र.५(१)(ब)(तीन) मधील तरतुदीनुसार मराठी व इंग्रजी टंकलेखनाची ३० शब्द प्रतिमिनिट या गतीने टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र कार्यालयाकडे विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक असताना श्री.खेडस्कर यांनी इंग्रजी टंकलेखन ३० शब्द प्रतिमिनिट या गतीने प्रमाणपत्र सादर केले नाही. श्री.खेडस्कर यांनी कनिष्ठ सहाय्यक लिपिक पदासाठी आवश्यक असलेल्या टंकलेखन अर्हता धारण करणे बाबत सेवा प्रवेश नियमातील अर्हतेचे उल्लंघन करण्याचा शिस्तभंग केल्या प्रकरणी त्यांची खाते निहाय चौकशी करणेत आली होती.

श्री.विजय खेडस्कर,व.सहा.यांचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप सिध्द होत असल्यामुळे त्यांना संदर्भ क्र.४ च्या आदेशान्वये ०९ महिन्याच्या आत इंग्रजी टंकलेखन ३० शब्द प्रतिमिनिट या गतीची टंकलेखन परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र या कार्यालयाकडे सादर करणेत यावे अन्यथा यांचेवर महाराष्ट्र जिल्हा परिषदा,जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ अन्वये कारवाई करण्यात येईल असे आदेश पारीत करण्यात आले आहेत.

ग्राम विकास विभागाकडील संदर्भ क्र.५ चे पत्रातील मार्गदर्शनानुसार "कनिष्ठ सहाय्यकांच्या मुळ नियुक्त्या हया महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ मध्ये दि ०१.१२.१९८८ व दिनांक ०१.०८.१९९१ च्या सुधारणेपूर्वीच्या आहेत म्हणजेच महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मध्ये दिनांक ०१.०८.१९८१ रोजी केलेल्या सुधारणेनुसार आहेत. अशा कनिष्ठ सहाय्यकांना मराठी किंवा इंग्रजी भाषेतील टंकलेखन ३० शब्द प्रति मिनिट (C.G.C.) प्रमाणपत्र असेणे आवश्यक आहे. यावरुन दिनांक ०१.०८.१९८१ च्या सुधारणानुसार नियुक्त केलेल्या कर्मचा-यांना नियुक्तीनंतर दोन वर्षात दुस-या भाषेतील टंकलेखन प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक नाही. मात्र दिनांक ०१.१२.१९८८ रोजी सेवा प्रवेश नियमात केलेल्या सुधारणेनंतर नियुक्त झालेल्या कनिष्ठ सहाय्यकांना २ वर्षाच्या आत दुस-या भाषेतील टंकलेखनाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे. जर या प्रकारे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतले नसेल तर, असे कर्मचारी प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणार नाही तोपर्यंत पुढील पदोन्नतीचे लाभ मिळण्यास पात्र ठरणार नाही "असे मार्गदर्शन प्राप्त झाले आहे.

श्री. विजय पांडूरंग खेडस्कर व.सहा. यांची अ.नो.सु.ता. ०५.०८.१९९१ अशी असुन ते ०१.१२.१९८८ रोजी सेवा प्रवेश नियमात केलेल्या सुधारणेनंतर 'कनिष्ठ सहाय्यक' या पदावर नियुक्त झालेले असल्यामुळे ग्राम विकास विभागाकडील दिनांक २५ फेब्रुवारी २०२२ च्या पत्रातील मार्गदर्शनानुसार त्यांना मराठी व इंग्रजी हे दोन्ही टंकलेखन परिक्षा पास असले बाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत श्री.खेडस्कर व.सहा. हे फक्त मराठी टंकलेखनाची ३० शब्द प्रतिमिनिट या गतीची टंकलेखन परीक्षा पास असल्यामुळे त्यांना इंग्रजी टंकलेखनाची ३० शब्द प्रतिमिनिट या गतीची टंकलेखन परीक्षा पास करणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता "श्री.विजय पांडूरंग खेडस्कर व.सहा.(लि.) हे **इंग्रजी टंकलेखनाची ३० शब्द प्रतिमिनिट या गतीची टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण झाले बाबतचे प्रमाणपत्र जो पर्यंत या कार्यालयाकडे सादर करत नाहीत तो पर्यंत ते पुढील पदोन्नतीचे लाभ मिळण्यास पात्र ठरणार नाहीत**" असे आदेश निर्गमित करण्यात येत असुन, श्री.विजय पांडूरंग खेडस्कर व.सहा.(लि.) यांची खातेनिहाय चौकशी या आदेशाव्दारे **बंद** करणेत येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री.विजय पांडूरंग खेडस्कर व.सहा.(लि.) यांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या https://www.zpratnagiri.org या संकेतस्थळावर उपलब्ध करणेत आली असुन त्यांचा संकेतांक क्रमांक **२०२२०८०२९१०६३** असा आहे.

**स्थळ प्रतिवर मा.मु.का.अ.जि.प.रत्नागिरी यांची स्वाक्षरी आहे.**

**सही/- (डॉ. इंदुराणी जाखड,भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद रत्नागिरी**

**प्रत :- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाही करीता..**
१) कार्यकारी अभियंता,ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, जि.प.रत्नागिरी.
२) श्री.विजय पांडूरंग खेडस्कर व.सहा.(लि.) यांना कार्यालयामार्फत
३) निवड नस्ती कार्यासन आस्था-९ (सामान्य प्रशासन विभाग)

(शेखर सावंत)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
जिल्हा परिषद रत्नागिरी